आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

३० ऑगस्ट २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- पालघर जिल्ह्यातल्या वाढवण बंदरासह विविध विकास कामांचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रारंभ, मालवण राजकोटमधला शिवरायांचा पुतळा पडल्याबद्दल प्रधानमंत्र्याकडून दिलगिरी व्यक्त

- शहर आणि गावातली दरी दूर करुन आर्थिक समावेशनासाठी वित्तविषयक तंत्रज्ञानानं मोलाची कामगिरी बजावली असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- झारखंडचे माजी मुख्यमंत्री चंपाई सोरेन यांचा भाजपात प्रवेश

- सहा लाख रुपयांचं बक्षीस असलेल्या नक्षलवाद्याचं गडचिरोली पोलिसांपुढं आत्मसमर्पण

**आणि**

- पॅरिस पॅरालिंपिकमध्ये नेमबाज अवनी लेखराच्या सुवर्ण पदकासह भारताची चार पदकांची कमाई

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यात वाढवण इथं ७६ हजार कोटी रुपये खर्चून बांधल्या जाणाऱ्या बंदराचं भूमीपूजन, तसंच २१८ मत्स्यपालन विकास योजनेसह विविध विकास योजनांचं उद्घाटन आणि लोकार्पण आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालं. हे आशियातल सर्वात मोठं आणि जगातल्या आघाडीच्या १० बंदरांमधलं एक बंदर असेल. वाढवण बंदरामुळे १२ लाख रोजगार निर्माण होतील, मच्छीमार आणि स्थानिकांच्या जीवनमानात अनेक सुधारणा होतील, असं त्यांनी सांगितलं....

**होल्ड- बाईट - मोदी (Modi Vadhvan 12LAKH ROJGAR)**

देशातल्या सर्व बंदरांमधून होणाऱ्या एकूण कंटेनर वाहतुकीपेक्षा अधिक कंटेनर वाहतूक या बंदरातून होईल. इथं येणाऱ्या हजारो जहाजं आणि कंटेनर मुळे परिसराचा चेहरा मोहरा बदलून जाईल, असं सांगत, त्यांनी स्थानिकांचं अभिनंदन केलं. महाराष्ट्राचा, या परिसराचा विकास होऊ नये असं वाटत असल्यानं विरोधक या बंदराला विरोध करत असल्याची टीका मोदी यांनी केली. दहा वर्षात मासे आणि झिंगे निर्यात दुप्पट झाल्यानं मच्छीमारांचं उत्पन्न वाढलं आणि जीवनमान सुधारलं याकडे त्यांनी लक्ष वेधलं.

महाराष्ट्राकडे विकासासाठी लागणारं सामर्थ्य आणि संसाधनं आहेत. महाराष्ट्राला समुद्री व्यापाराचा इतिहास आहे आणि भविष्यातही व्यापाराच्या संधी आहेत, असं ते म्हणाले…

**बाईट (Modi Vadhvan FORT PORT)**

मालवणमध्ये राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा पडल्याबद्दल मोदी यांनी दिलगिरी व्यक्त केली. शिवाजी महाराज हे आमच्यासाठी आराध्य दैवत आहेत. त्यांची, तसंच या घटनेमुळे ज्यांच्या भावना दुखावल्या त्यांचीही मी क्षमा मागतो, असं प्रधानमंत्री म्हणाले.

स्थानिक मच्छीमारांना transponders चं वाटप त्यांनी केलं. हे transponder बोटीवर लावायचे असून याद्वारे संपर्क व्यवस्था प्रस्थापित करणं सहज शक्य होणार आहे. इस्त्रोनं विकसित केलेले हे transponder देशातल्या १ लाख बोटीवर लावले जाणार आहेत. यावेळी प्रधानमंत्र्यांनी काही मच्छीमारांना किसान क्रेडिट कार्डचंही वाटप केलं.

हे वाढवण बंदर राज्यासाठी प्रगतीचं नवं शिखर ठरेल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. या बंदराची निर्मिती करताना सर्वांचं हित ध्यानात

ठेवू, कुणालाही वाऱ्यावर सोडणार नाही, याची ग्वाही त्यांनी दिली. वाढवण बंदर म्हणजे राज्यातल्या जनतेला प्रधानमंत्र्यांनी दिलेली भेट आहे. यामुळे आत्मनिर्भर आणि विकसित भारतात महाराष्ट्राची भूमिका आणखी मजबूत होईल, असं केंद्रीय बंदर, नौवहन आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी सांगितलं.

वाढवण बंदरामुळे आर्थिक क्षेत्रात मुंबईचं आघाडीचं स्थान कायम राहील, यामुळे मच्छीमारांच्या आयुष्यात सकारात्मक बदल होतील, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले. तर बंदरामुळे कुणाचंही  नुकसान होऊ देणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

गेल्या १० वर्षात देशातलं मत्स्योत्पादन दुप्पट झालं आहे. १०० हून अधिक देशात भारतातले मासे आणि संबंधित उत्पादनांची निर्यात होते, असं केंद्रीय मंत्री राजीव रंजन सिंह म्हणाले.

त्याआधी मुंबईत वित्त आणि तंत्रज्ञान विषयक ग्लोबल फिनटेक फेस्टला प्रधानमंत्र्यांनी संबोधित केलं. शहर आणि गावातली दरी दूर करुन, आर्थिक समावेशनासाठी वित्तविषयक तंत्रज्ञानानं, मोलाची कामगिरी बजावली असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या दुपारी दूरदृष्य प्रणालीद्वारे तीन नव्या वंदे भारत रेल्वेगाड्यांना हिरवा झेंडा दाखवणार आहेत. या नव्या रेल्वेगाड्यांमुळे मेरठ-लखनौ, मदुराई-बेंगळुरू आणि चेन्नई-नागरकोइल या तीन मार्गांवरची संपर्क व्यवस्था सुधारणार आहे.

**<><><><><>**

झारखंडचे माजी मुख्यमंत्री चंपाई सोरेन यांनी आज भाजपात प्रवेश केला. झारखंडमधल्या संथाल परगणा भागात बांगलादेशातून होणाऱ्या घुसखोरीमुळे धोक्यात आलेली आदिवासी अस्मिता आणि अस्तित्व सुरक्षित राखण्यासाठी

आपण भाजपात प्रवेश करणार असल्याचं चंपाई सोरेन यांनी सांगितंल. आज दुपारी रांचीमधे धुर्वा मैदानात झालेल्या कार्यक्रमात त्यांनी भाजपात प्रवेश केला.

<><><><>

वक्फ घटनादुरुस्ती विधेयक २०२४ च्या अभ्यासाकरता नेमलेल्या संयुक्त संसदीय समितीची बैठक आज नवी दिल्लीत झाली. या बैठकीला मुंबईच्या ऑल इंडिया सुन्नी जमायुतुल उलेमा आणि नवी दिल्लीच्या इंडियन मुस्लीमस फॉर सिविल राईट्स या संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. खासदार जगदंबिका पाल यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या या समितीनं सार्वजनिक, स्वयंसेवी संस्था, तज्ञ आणि संस्थांसह भागधारकांकडून मतं आणि सूचना मागवल्या होत्या.

<><><><>

गडचिरोलीत नक्षलवाद्यांच्या पश्चिम उपक्षेत्र विभाग तांत्रिक समितीचा सदस्य केदार उर्फ मन्या किंजो नैताम यानं आज पोलिसांसमोर आत्मसमर्पण केलं. शासनाने त्याच्यावर ६ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं. २०१२ ते २०२० पर्यंत तो प्लाटून क्रमांक १५ मध्ये कार्यरत होता. त्याच्यावर चकमकीचे १८, जाळपोळीचे ३, खुनाचे ८ आणि अन्य ६ अशा एकूण ३४ गुन्ह्यांची नोंद आहे. आत्मसमर्पण योजना सुरु झाल्यापासून गडचिरोलीत ६७३ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं आहे.

<><><><>

पॅरीस पॅरालिम्पिक स्पर्धेत आज भारतानं एक सुवर्ण, एक रौप्य
आणि दोन कांस्यपदकं अशी चार पदकं मिळवली. नेमबाजीच्या १० मीटर एअर रायफल स्टॅन्डिंग प्रकारात आज भारताच्या अवनी लेखरानं नवा विक्रम नोंदवत सुवर्णपदकाची कमाई केली. तिनं २४९ पूर्णांक ७ दशांश गुण मिळवत ही ऐतिहासिक कामगिरी नोंदवली. याच प्रकारात भारताच्या मोना अगरवालनं २२८

पूर्णांक ७ दशांश गुणांची कमाई करत कांस्यपदक पटकावलं◌ं. पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तुल एस एच वन प्रकारात मनीष नारवालने रौप्यपदक जिंकलं.

महिलांच्या १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत भारताच्या प्रीति पालनं कांस्यपदक मिळवलं. १४ . २१ सेकंदांची वेळ नोंदवत तिनं वैयक्तिक सर्वा◌ेत्तम कामगिरी केली.  बॅडमिंटनमधे भारताच्या नितेश कुमारनं पुरूष एकेरीच्या एसएस ३ प्रकारात चीनच्या यांग जिआनहुआनला २१-५, २१-११ असं सरळ गेममधे नमवत उपांत्य फेरीत धडक मारली. चारजणांच्या ग्रुप ए मधे दुसरा विजय मिळवून तो या गटात दुसऱ्या स्थानावर आला. दोन गटातले पहिले दोन खेळाडू उपांत्य फेरीत दाखल होत असल्यामुळे त्यानं ही फेरी गाठली. सुहास यथिराजनंही दक्षिण का◌ेरियाच्या क्यु वान शिनला सरळ गेममधे पराभूत करत पुरूष एकेरी एसएल ४ प्रकारात उपांत्य फेरीत प्रवेश केला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पदकविजेत्यांचं अभिनंदन केलं आहे.

<><><><><>

चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत, देशाचा प्रत्यक्ष जीडीपी अर्थात स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा अनुमानित दर ६ पूर्णांक ६ दशांश टक्के आहे. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयानं आज जाहीर केलेल्या अहवालात हे अनुमान दिलं आहे. चलनफुगवटा विचारात न घेता, मोजलेला नॉमिनल जीडीपी वाढीचा दर या तिमाहीत ९ पूर्णांक ७ दशांश टक्के राहिला. तर एकूण मूल्यवर्धन या तिमाहीत ६ पूर्णांक ८ दशांश टक्क्यांनी वाढलं.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ३ सप्टेंबरपासून ब्रुनेई आणि सिंगापूरच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. परराष्ट्र व्यवहार प्रवक्ते रणधिर जैसवाल यांनी नवी दिल्लीत वार्ताहरांना ही माहिती दिली. ब्रुनेईचे सुलतान हजि हसनल बोलकिआ यांच्या निमंत्रणावरून ते ३ तारखेला  ब्रुनेई दारूसालमला जातील. मोदी हे या देशाचा

दौरा करणारे पहिले भारतीय प्रधानमंत्री आहेत. सिंगापूरचे प्रधानमंत्री लॉरेन्स वाँग यांच्या आमंत्रणावरून ते चार सप्टेबरला सिंगापूरला रवाना होतील.

**<><><><><>**

यंदाच्या गणेशोत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींवरची बंदी तूर्त टळली आहे. पीओपीच्या गणेशमूर्तींवर बंदी आणण्याची मागणी करणारी याचिका मूर्तिकार आणि पर्यावरणवाद्यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली होती. त्यावर आज मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या पीठासमोर सुनावणी झाली.

गणेशोत्सव अवघा काही दिवसांवर आल्यामुळे यंदा प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींवर बंदी घालता येणार नाही. मात्र, राज्य सरकारनं केंद्रीय प्रदूषण मंडळाच्या २०२० च्या मार्गदर्शक तत्वांचं पालन करण्याचे आदेश उच्च न्यायालयानं दिले.

**//<><><><><>//**